**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन

## पोलीसांनी शोधून काढला मोबाईल

अंकित गिरीष अगरवाल, रा.मंगलदास रोड, पुणे यांचा दि.२२/०१/२०१९ रोजी सॅमसंग नोट-८ मोबाईल ४५ हजार रूपये किंमतीचा विमाननगर ते मंगलदास रोड, पुणे या दरम्यान ओला कॅबने प्रवास करीत असताना पडून गहाळ झाल्याने, त्याबाबत त्यांनी ऑनलाईन प्रॉपर्टी मिसींग एल आर नं.०२२६०००२०१८ अन्वये, दि.२३/०१/२०१९ रोजी नोंद केली.

नमूद सॅमसंग नोट-८ मोबाईल संदर्भात दिलेल्या मिसींगची माहिती पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे यांनी घेवून सदर मोबाईलचा आयएमईआय नंबर ट्रेसिंगला लावला. सदर तांत्रिक विश्लेषणावरून सदरचा मोबाईल हा इसम नामे बालाजी नामदेव बिरादार, रा.फुरसुंगी, भेकराईनगर, पुणे यांचे ताब्यात असल्याचे समजून आल्याने, त्यांचेशी संपर्क करून मोबाईल ताब्यात घेवून, तो अंकित गिरीष अगरवाल यांना परत केलेला आहे. अशा प्रकारे श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधून काढलेला आहे. मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदार हे पोलीसांचे कामगिरीवर खूष होवून, पोलीसांना धन्यवाद दिले.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे